क्रमांक : ज्येसू-१५२६/वाचा-लिटं-ता २६/४७/प्रशा-२/२५५
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकिय इमारत, आठवा मजला,
मुंबई उपनगर जिल्हा, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दिनांक : १८/०३/२०२६

परिपत्रक

**विषय :- लिपिक टंकलेखक, गट क पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी अर्हता प्राप्त करणा-या वाहनचालक संवर्गामधील कर्मचा-यांची दिनांक १/१/२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची (provisional) प्रसारीत करणेबाबत.**

शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरटीआर २०१४/प्र.क्र.३५५/१२, दिनांक ६/६/२०१७, क्रमांक आरटीआर १०१३-/प्र.क्र.५०/१३/१४-अ, दिनांक २१/२/२०१८ अन्वये वाहनचालक संवर्गातून लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी पदवी परीक्षा उत्तीर्ण अशी शैक्षणिक अर्हता करण्यात आलेली आहे.

२. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ५/१२/२०१८ अन्वये मंत्रालयीन विभागातील वाहनचालक पदावरुन लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती विषद केली आहे. मंत्रालयीन विभागाच्या धर्तीवर संचालनालयातील वाहनचालक संवर्गामधील जे कर्मचारी लिपिक टंकलेखक पदावरील कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी विहित अर्हता धारण करीत असतील त्यांची दिनांक २१/२/२०१८ नंतरच्या प्रत्येक वर्षी दिनांक १ जानेवारी रोजीची ज्येष्ठतासूची तयार करुन त्या आधारे लिपिक टंकलेखक पदावर ज्येष्ठता अधीन पात्रता या निकषावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्याबाबत नमूद केले आहे. तसेच सदर ज्येष्ठतासूचीमध्ये पदवी परीक्षा उत्तीर्ण व वाहनचालक संवर्गामध्ये तीन वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या व टंकलेखनातील आवश्यक गती (मराठी ३० श.प्र.मि.) किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि. असल्याचे नियमानुसार विहित केलेले प्रमाणपत्र (शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र (गव्हर्नमेंट कमर्शिअल सर्टिफिकेट)) किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेल्या कर्मचा-यांचा समावेश असेल, असे नमूद केले आहे.

३. सन २०२४ मध्ये लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी वाहनचालक संवर्गातील कर्मचा-यांचे अर्ज प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे दि.१/१/२०२५ रोजीची ज्येष्ठतासूची प्रसारीत करण्यात आलेली नाही. संचालनालयातील वाहनचालक संवर्गातील कर्मचा-यांपैकी, गट-क मधील लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी अर्हता प्राप्त व लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी अर्ज केलेल्या कर्मचा-यांची दिनांक १/१/२०२६ रोजीची तात्पुरती (provisional) ज्येष्ठतासूची संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसारीत केली आहे.

कृ.मा.प.

४. या परिपत्रकान्वये सर्व प्रादेशिक विभाग प्रमुखांना विनंती करण्यांत येते की, प्रस्तुत तात्पुरती (provisional) ज्येष्ठतेनुसार यादी त्यांनी आपल्या विभागातील वाहनचालक संवर्गातील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावी. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बिंदुना-१०१८/प्र.क्र.५४/१४-अ, दिनांक ५/१२/२०१८ मधील सूचनांनुसार एखाद्या कर्मचा-याचे नाव ज्येष्ठतेनुसार यादीत समाविष्ट करावयाचे राहीले असल्यास त्याबाबत संबंधित कर्मचा-यांनी कार्यालयप्रमुखांमार्फत निवेदन सादर करावे, अशा सूचना त्यांना देण्यांत याव्यात. एखाद्या कर्मचा-याचे नाव यादीत समाविष्ट करावयाचे राहिले असल्यास संबंधित प्रादेशिक विभाग प्रमुखांनी त्या कर्मचा-याची सविस्तर माहिती संचालनालयास तीन आठवड्याच्या आत कळवावी.

५. तसेच या परिपत्रकान्वये सर्व संबधित कर्मचा-यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संकेतस्थळावर प्रसारीत केलेल्या तात्पुरत्या ज्येष्ठता सूचीबाबत त्यांचे काही वास्तविक आक्षेप अथवा त्रुटी (नांव, जन्मदिनांक, प्रवर्ग, रुजू दिनांक, ज्येष्ठता इत्यादी) असल्यास ते आक्षेप / त्रुटी हे परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापासून तीन आठवड्याच्या आत संचालनालयाकडे त्यांच्या कार्यालयप्रमुखामार्फत पाठवावेत व एक आगाऊ प्रत संचालनालयास परस्पर पाठविण्यात यावी. आक्षेप कळविताना आपला ज्येष्ठताक्रम आक्षेपात नमूद करावा. जन्मदिनांक तद्वतच जातीच्या प्रवर्गासंबंधी आक्षेप असल्यास सेवापुस्तकाच्या पहिल्या पृष्ठाची, शाळा सोडल्याच्या दाखल्याची व जातीचे प्रमाणपत्र/जातीचे वैधता प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत अर्जासोबत संचालनालयास पाठविण्यात यावीत. मुदतीनंतर पाठविण्यात आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

६. ज्या कर्मचा-यांची जाती दावा पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत/जाती दाव्याची पडताळणी झालेली नाही अशा कर्मचा-यांच्या जाती दावा पडताळणीचा निर्णय प्राप्त होईपर्यंत त्यांची ज्येष्ठता अस्थायी स्वरुपातील असून त्यांच्या ज्येष्ठता सूचीतील जातीच्या नोंदी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात वैधता प्राप्त होईल या अटीस राहून नोंदल्या आहेत.

७. प्रस्तुत परिपत्रक मिळाल्याची पोच उलट टपाली संचालनालयास संबंधित कार्यालयामार्फत पाठविण्यात यावी.

(नि.म.प्रभुदेसाई)
उप संचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.

प्रति,
श्री./श्रीमती --------------------------------------, वाहनचालक,
------------------------------------------------
------------------------------------------------

प्रत : १. सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय (सर्व).
२. उप संचालक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय (सर्व).
३. कक्ष अधिकारी (का-१४२६), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रपत्र ब**

**अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील वाहनचालक संवर्गातून लिपिक टंकलेखक पदावर संवर्गबाह्य बदलीने नियुक्तीसाठी दिनांक १.१.२०२६ रोजी पात्र असलेल्या कर्मचा-यांची ज्येष्ठतेनुसार तात्पुरती यादी**

| अ.क्र. | वाहनचालक संवर्गामधील कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याचा जात प्रवर्ग | जन्म दिनांक | वाहनचालक संवर्गामधील नियुक्तीचा दिनांक | पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मराठी ३० श.प्र.मि./ इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र / संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | एमएससीआयटी संगणक परीक्षा उत्तीर्ण केल्याचा दिनांक | लिपिक टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्गबदलीने नियुक्तीसाठी ज्येष्ठता दिनाक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | श्री. प्रशांत बाबुराव पाटील | इमाव | ११-०९-१९८० | १२-१२-२०१४ | ०६-०७-२०२५ | ०७-०२-२००५ | १०-०३-२००५ | ०६-०७-२०२५ | ३०-०९-२०३८ | |

(नि. म. प्रभुदेसाई)
उप संचालक (प्रशासन),
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.